Chauthi Pariksha – Reading

# स्वप्न

स्वप्न फारच जादुई असतात. आपल्याला एखादे गंमतशीर किंवा मस्त स्वप्न पडले की आपण भारी खूष होतो. पण जर भयानक स्वप्न पडले तर मात्र भीतीने झोपेतून जागे होते. घाबरगुंडी उडते! काही स्वप्न आपल्याला आठवतच नाहीत तर काही इतकी खरी वाटतात की स्वप्नातल्या गोष्टी खरच घडल्या की काय असे वाटते. शास्त्रज्ञांनी स्वप्न या विषयावर बराच अभ्यास केला आहे.

प्रश्न

१. स्वप्न कोणत्या प्रकारची असतात?
२. भयानक स्वप्न पडले की काय होते?
३. स्वप्न या विषयावर कोणी अभ्यास केला आहे?
४. तुम्हाला पडलेल्या एखाद्या स्वप्नाबद्दल सांगा. (दोन गुण)

Chauthi / Pachavi –Reading

# <u>सुपरबॉल</u>

फुटबॉल या खेळाच्या विजेतेपदासाठी दरवर्षी होणारी चुरस म्हणजे सुपरबॉल. अमेरिकेतील राष्ट्रीय फुटबॉल संघटनेत असलेले ३२ संघ दोन गटांत विभागलेले आहेत. ते राष्ट्रीय फुटबॉल संघ आणि अमेरिकन फुटबॉल संघ या नावाने ओळखले जातात. हिवाळ्यात फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या रविवारी अंतिम फेरीत पोहोचलेल्या दोन संघात लढत होते. हा रविवार ‘सुपरबॉल सन्डे’ म्हणून ओळखला जातो. २०१६ हे सुपरबॉलचं ५० वे वर्ष.

सुपरबॉल सन्डेच्या निमित्ताने सगळे एकत्र जमतात. फराळ करून गप्पा मारत लाखो लोक हा खेळ टीव्हीवर पाहतात. हा खेळ जितका खेळासाठी प्रसिद्ध आहे, तितकाच <u>मध्यांतरात</u> (Half time) होणारे कार्यक्रम आणि जाहिरातींसाठीही प्रसिध्द आहे. सुपरबॉल <u>प्रसाराच्या</u> (Broadcast) दरम्यान टीव्हीवर जाहिरात झळकण्यासाठी कंपन्यांना ३० सेकंदांसाठी जवळजवळ ३० लाख डॉलर्स मोजावे लागतात.

<u>प्रश्न</u>

१. सुपरबॉल म्हणजे काय?
२. ‘सुपरबॉल सन्डे’ कोणत्या रविवार ला म्हणतात?
३. २०१६ हे सुपरबॉल कितवे वर्ष होते?
४. सुपरबॉल हा खेळाशिवाय अजून कश्यासाठी प्रसिध्द आहे?
५. सुपरबॉल प्रक्षेपणाच्या दरम्यान कंपन्या काय करतात?

Chauthi / Pachavi – Reading

# पहिला पक्षी कोणता असावा?

१९६१ साली जर्मनीमध्ये डायनॉसॉरसचा अभ्यास करण्यासाठी जमिनीमध्ये खोदकाम सुरू झाले. त्यामध्ये एका दगडात खूप वेगळा ठसा दिसला. एखाद्या छोट्या डायनॉसॉरस सारखा. त्याच्या चोचीसारख्या तोंडात दात होते. शेपटीमध्ये हाडे होती. तो अंडी घालत असावा. ह्या सर्व गोष्टी सरपटणाऱ्या प्राण्यांसारख्या होत्या. पिसांमुळे तो पक्षी आहे हे समजले. त्याच्यामध्ये सरपटणारे प्राणी आणि पक्षी या दोघांचेही अवयव होते. त्याचे नाव ठेवले आर्किऑप्टरेक्स (Archaeopteryx).

हा पक्षी साधारण पंधरा कोटी वर्षांपूर्वीचा असावा असा अंदाज केला गेला. ह्या पक्षाच्या दोन्ही पंखांना जोडणारे एक हाड होते. ते इंग्लिश 'यू' अक्षरा सारखे दिसत होते . पंख वर खाली हलवण्यासाठी ते हाड खूप महत्त्वाचे असावे. ह्या पक्षापासून इतर पक्षी कसे निर्माण झाले असतील ते समजले.

प्रश्न

१. कोणाचा ठसा सापडला?
२. खोदकाम कुठे व कोणत्या साली झाले?
३. त्या प्राण्याचे वर्णन करा.
४. किती वर्षापूर्वीचा प्राणी असावा?
५. सरपटणारे प्राणी उडतात का? का नाही?

Chauthi / Pachavi – Reading

# पाणी

तुम्हाला माहिती आहे का - पृथ्वीवरचे फक्त एक टक्का पाणी लोकांच्या वापराकरता उपलब्ध आहे! बाकीचे सर्व पाणी समुद्रातले खारं पाणी आहे किंवा बर्फात गोठलेलं आहे - जे लोकांना पिण्याकरता, कपडे धुण्याकरता किंवा बागेकरता वापरता येत नाही. जशी पृथ्वीवरची जनसंख्या वाढते आहे, तशी लोकांची पाण्याची गरज पण वाढते आहे. पृथ्वीवर पाण्याचा साठा मर्यादित आहे.

पृथ्वीवरचा पाणी पुरवठा पावसावर अवलंबून आहे. मागच्या वर्षी मॉनसूनमधे कमी पाऊस पडल्यामुळे महाराष्ट्रात दुष्काळ पडला आहे. छोट्या खेडेगावात आठवड्यातून एकदाच नळाला पाणी येतं. आपण सर्वांनीच पाणी जपून वापरले पाहिजे.

<u>प्रश्न</u>

१. पृथ्वीवरचे किती टक्के पाणी पिण्याकरता वापरता येते?
२. पृथ्वीवरची पाण्याची गरज कशामुळे वाढते आहे?
३. पृथ्वीवरचा पाणी पुरवठा कशावर अवलंबून आहे?
४. दुष्काळ म्हणजे काय?
५. तुम्ही पाणी कसे वाचवाल?

Pachavi – Listening

# <u>अमेरिकन अध्यक्षीय निवडणुक-२०१६</u>

८ नोव्हेंबर २०१६ रोजी अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुका होणार आहेत. अमेरिकेतील डेमॉक्रॅटिक आणि रिपब्लिकन हे दोन महत्त्वाचे पक्ष आहेत. आपले <u>उमेदवार</u> जुलै-ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या पक्षांच्या राष्ट्रीय अधिवेशनात निवडतात. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन १८ ते २१ जुलै २०१६ रोजी क्लिव्हलँड येथे होणार आहे. डेमॉक्रॅटिक पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २५ ते २८ जुलै २०१६ रोजी फिलाडेल्फिया या ऐतिहासिक शहरात होणार आहे. या अधिवेशनांमध्ये रिपब्लिकन पक्षाचे एकूण २४७२ <u>प्रतिनिधी</u> आणि डेमॉक्रॅटिक पक्षाचे एकूण ४७६४ <u>प्रतिनिधी</u> त्यांच्या पक्षांचे उमेदवार निवडणार आहेत.

डेमॉक्रॅटिक पक्षात हिलरी क्लिंटन या उमेदवार आघाडीवर आहेत. बर्नी सॅन्डर्स हे दुसऱ्या क्रमांकावर आहेत. रिपब्लिकन पक्षात डॉनल्ड ट्रम्प हे उमेदवार आघाडीवर आहेत आणि टेड क्रुझ दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

<u>प्रश्न</u>

१. अमेरिकेतील दोन महत्त्वाचे पक्ष आपले उमेदवार कधी निवडतात?
२. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २०१६ मध्ये कधी होणार आहे?
३. डेमॉक्रॅटिक पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन २०१६ मध्ये कुठे होणार आहे?
४. रिपब्लिकन पक्षात दुसऱ्या क्रमांकावर कोणता उमेदवार आहे?
५. डेमॉक्रॅटिक पक्षात कोण आघाडीवर आहे?